# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांच्या विकासासाठी
**{प्रकल्प — 1 विभाग}** विशेष तरतूद योजनेअंतर्गत जी - २० परिषदेच्या अनुषंगाने शासन शुध्दीपत्रक क्रमांक मनपा-२०२२/प्र.क्र. ४७१/ नवि - १६, दि. ०९ ऑक्टोंबर, २०२३ अन्वये मंजूर शासन निधीतील रु. १०.८३५ कोटी शिल्लक निधीतून भिंतीचित्रावरील चित्रे व म्युरल्स (झोन मधील निवडक भिंती) याकरीता रु. २.८० कोटी रकमेच्या एकुण ९ झोन मधील कामांना मंजूरी प्राप्त आहे.

भिंती चित्रावरील चित्रे व म्युरल्स (झोन मधील निवडक भिंती) चे कामाकरीता थीम तयार करणे व अनुषंगीक कामास्तव प्राचार्य, डॉ. रविंद्र हरीदास, धरमपेठ शिक्षण संस्था द्वारा संचालित नटराज आर्ट अॅन्ड कल्चर सेंटर, धरमपेठ, नागपूर यांचेशी प्रकल्प राशीच्या २ टक्के दराने, MoU करण्यास्तव मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप:-

१) विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 658/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 15/12/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, प्रकल्प - 1 विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजनेअंतर्गत जी - २० परिषदेच्या अनुषंगाने शासन शुध्दीपत्रक क्रमांक मनपा-२०२२/प्र.क्र. ४७१/ नवि - १६, दि. ०९ ऑक्टोंबर, २०२३ अन्वये मंजूर शासन निधीतील रु. १०.८३५ कोटी शिल्लक निधीतून भिंतीचित्रावरील चित्रे व म्युरल्स (झोन मधील निवडक भिंती) याकरीता रु. २.८० कोटी रकमेच्या एकुण ९ झोन मधील कामांना मंजूरी प्राप्त आहे.

भिंतीचित्रावरील चित्रे व म्युरल्स (झोन मधील निवडक भिंती) चे कामाकरीता थीम तयार करणे व अनुषंगीक कामास्तव प्राचार्य, डॉ. रविंद्र हरीदास, धरमपेठ शिक्षण संस्था द्वारा संचालित नटराज आर्ट अॅन्ड कल्चर सेंटर, धरमपेठ, नागपूर यांचेशी प्रकल्प राशीच्या २ टक्के दराने, MoU करण्यास्तव मंजुरी प्रदान करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**